स्थायी समितीच्या **शनिवार** दिनांक 02–02–2013 रोजी दुपारी 03–00 वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

## उपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 3. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 4. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 5. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 6. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 7. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 8. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 9. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |
| 10. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 11. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 12. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 13. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 14. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |
| 15. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |

## अनुपस्थित सभासद

| | | |
|---|---|---|
| 16. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |

## उपस्थित अधिकारी

1) श्री. हेमंत कुमार पवार, अपर आयुक्त

2) श्री. हरीश दुबे, निगम सचिव

मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेच्या कार्यवाहीला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक 345** :– लक्ष्मीनगर झोन क्र.1 अंतर्गत हिंगणा टि पॉईट ते सहकार नगर घाटापर्यंत मुख्य मल निस्सारण वाहीणीचे पुर्न बांधणी करणे.

लक्ष्मीनगर झोन क्र. 1 अंतर्गत हिंगणा टि पॉईट ते सहकार नगर घाटापर्यत मुख्य मल निस्सारण वाहीणीचे पुर्न बांधणी करणे, हया कामाच्या रु.27.50 कोटीचे ढोबळ प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणे, तसेच सदहु काम प्रावधान उपलब्धतेनुसार टप्प्यात करावयास व त्यापैकी प्रथम टप्प्याने स्वावलंबीनगर, नागोबा मंदिर ते सहाकार नगर घाटापर्यंत मलवाहिनी टाकण्याचे कामाचे रु.7.59 कोटीचे ढोबळ प्राकलनास मंजूरी प्रदान करुन वर्ष 2012–13 मध्ये पद क्र. 619 मधुन हयास प्रावधान उपलब्ध करुन प्रथम चरणाच्या विस्तृत प्राकलनास तांत्रिक मंजूरी करुन निविदा काढण्यासह विषयास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासकीय मान्यतेस मंजुरी प्रदान करण्यात येते, आर्थिक वर्ष 2012–13 मध्ये निविदा काढव्या, परंतु 2012–2013 सुधारीत किंवा 2013–2014 च्या प्रस्तावित अंदाज पत्रकात कार्यालयाने तरतुद उपलब्ध करणे आवश्यक राहील व सर्व्हेक्षण व सल्लागाराची नियुक्ती करण्याचे अधिकार आयुक्तांना देण्यास मंजुरी प्रदान करण्यास समिती एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 346** :– प्रभाग क्र. 39 अ व ब, महात्मा गांधी प्रभाग, येथील झेंडा चौक, महाल ते गंगाबाई घाट चौक (सिमेंट रोड ) पर्यंतच्या सी.आर.आय.पी. योजने अंतर्गत बांधलेल्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु. 49,99,896/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच या कामास्तव निविदा मागविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासकीय मान्यतेसह लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 347** :– प्रभाग क्र. 39 अ व ब, महात्मा गांधी येथील ढिवरपुरा भागातील म.न.पा. शाळे जवळील नाला आर.सी.सी.बॉक्स सेल मध्ये तयार करण्याचे कामास्तव रु. 44,99,990/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा

तसेच या कामास्तव निविदा मागविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासकीय मान्यतेसह लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 348** :– प्रभाग क्र. 17 ब, मध्ये बस्तरवारी गणपती मंदिर ते झाडे चौकापर्यंत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरणाचे कामास्तव रु. 34,99,516/–रकमेच्या प्राकलनास पद क्र. 681 अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासकीय मान्यतेसह लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 349** :– प्रभाग क्र. 36 मधील पारडी, भांडेवाडी, वर्धमाननगर व देशपांडे ले–आऊट मधिल रस्त्यांची सुधारणा / पुनर्डांबरीकरणाचे कामास्तव रु. 29,99,954/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. 682 (फिक्स प्रा.) अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 350** :– प्रभाग क्र. 58 अंतर्गत सावित्रीबाई फुले नगर येथील मुख्य रस्त्याचे विकासाचे काम करण्याचे कामास्तव प्राप्त निविदांपैकी मे.आर.एम.दयारामानी, यांची प्राकलनीय दरांपेक्षा 0.34 टक्के कमी दरांची रु.29,88,803/– रकमेची निम्नतम निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 351** :– वाहतुक पोलीसांचे उत्तर आणि इंदोरा झोन अंतर्गत येणारे रस्ते/बाजार परिसरात हॉट अप्लाईड थर्मोप्लास्टीक मटेरियल नी पार्कींग पट्टयाची मार्कींग करण्याकरिता ची नियमित ई–निविदा मॅन्युफॅक्चर्स किंवा ॲथोराईझड डिलर कडून मागविण्या करीता रुपये 31,00,000/– च्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासकीय मान्यतेसह लघुनिविदा काढण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 352** :– प्रभाग क्र. 53 अ व ब मध्ये बाजीप्रभु नगर व गोकुलपेठ येथील रस्त्यांचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचा कामास्तव रु. 29,97,986/– च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन प्रशासकीय मान्यतेसह लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 353** :– नागपूर महानगरपालिकेच्या गीता ग्राऊंड अभिन्यासातील मा. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार ताब्यात घेण्यात आलेल्या भुखंड क्र. 5, '' आनंद टॉकीज '', सिताबर्डी या भुखंडावर बांधण्यात आलेल्या इमारतीचा मोबदला रु.83,45,035/– सरोज स्क्रीन (प्रा.) लि. ला देण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 354** :– म.न.पा.केंद्रिय कार्यालय सिव्हील लाईन परिसरातील महानगरपालिकेच्या मालकीची तळमजल्यावरील इमारतीमधील उपहारगृह चालविण्याकरिता निविदा बोलविण्यात आली असता सफल निविदाकार मे. बाबा कॅफे यांचे वाटाघाटीनंतर प्राप्त महत्तम दर रु. 24,000/– प्रती महिना चे निविदेस मंजुर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 355** :– प्रभाग क्र. 68–'अ' येथील नरेन्द्रनगर चौक ते चक्करवार चौक ते रचना वाटीका पर्यंत तसेच नरेन्द्रनगर चौक ते परिश्रम अपार्टमेन्ट ते रेल्वे गेट ते वल्लभ नगर नाल्यापर्यत रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामास्तव रु. 39,99,990/– च्या प्राकलनास मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न विचारात घेणे तसेच निविदा काढण्याचे परवानगीचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 356** :– जुनी शुक्रवारी रोड (ग्रेट नाग रोड पासुन महाल कडे जाणाऱ्या मार्गावरील) नागनदी वरील पुलाचे रुंदीकरण करण्याचे कामास्तव प्राप्त 4 निविदा पैकी मे. सुविचार कन्स्ट्रक्शन यांची प्राकलनीय रकमेपेक्षा 12. 06 टक्के कमी दराची रु. 1,45,01,880/– रक्कमेची निविदा स्विकृत करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 357** :–

| अ.क्र. | कामांचे नाव | प्राकलनीय रक्कम | खालील पद क्रमांक अंतर्गत प्रावधानाची नोंद घेण्यात आली आहे. |
|---|---|---|---|
| 1. | नागपूर वाहतुक पोलीस झोन अंतर्गत नागपूर शहरातील मुख्य रस्त्यावर हॉट अप्लाईड थर्मोप्लास्टीक मटेरियलनी लेन मार्कींग करणे. | 14,50,000/– | 692 |
| 2. | नागपूर वाहतुक पोलीस झोन अंतर्गत नागपूर शहरातील मुख्य चौरस्त्यावर हॉट अप्लाईड थर्मोप्लास्टीक मटेरियलनी स्टॉप आणि ऍरो आखणे. | 10,27,300/– | 691 |
| 3. | नागपूर वाहतुक पोलीस झोन अंतर्गत नागपूर शहरातील पार्कींग आणि नो पार्कींग च्या ठिकाणी हॉट अप्लाईड थर्मोप्लास्टीक मटेरियलनी **P** आणि **NP** शब्द आखणे. | 10,13,000/– | 697 |
| | एकूण रुपये | 34,90,300/– | |

वरील प्रमाणे कामे करण्याकरिता ची नियमित ई–निविदा मॅन्युफॅक्चर्स किंवा ॲथोराईझड डिलर कडून मागविण्या करीता रुपये 34,90,300/– च्या प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्यासह समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 358** :– मनपाच्या सन 2012 –13 मधील अंदाजपत्रकातील पद क्र. 343''BSUP घरकुल योजने अंतर्गत मनपाचा सहभाग '' करिता ठेवण्यात आलेल्या एकूण 30.00 कोटी प्रावधानातून मागासवर्गीयांच्या राखीच तरतुदीच्या विविध पदांमध्ये खालील प्रमाणे रु .8.00 कोटी निधी वळता करण्यास मंजुरी देण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

| पद क्र. | पदांचे नांव | वळती करावयाची प्रस्तावित राशी |
|---|---|---|
| 670 | गलिच्छ वस्ती सुधारणा अंतर्गत अतिरिक्त सवलती | 2 कोटी |
| 350 | खांडकी व सिमेंट पेव्हींग व दुरुस्ती | 1 कोटी |
| 625 | भुमिगत नाली बांधणे | 1 कोटी |
| 405 | मागासवर्गीय वस्तीत इले. पोल लावणे. | 1 कोटी |
| 626 | स्वस्त प्रकारचे संडास बांधणे | 1 कोटी |
| 685 | रस्त्याचे निर्माण | 1 कोटी |
| 710 | उद्यान सुधारणा | 1 कोटी |
| | एकूण रु. | 8 कोटी |

**ठराव क्रमांक 359** :— लोककर्म विभाग, लक्ष्मीनगर झोन क्र.1 मध्ये सन 2012—13 च्या झोनल आयव्ययका (महसूली व भांडवली ) मध्ये प्रस्तावित विविध पदा अंतर्गत कामाची आवश्यकता नसल्याने व प्रभाग समिती ठराव क्र. 78 दि. 27.2.2012 नुसार मंजुरी प्रमाणे पदामधील तरतुद इतर आवश्यक पदा अंतर्गत करणे आवश्यक आहे व हयामध्ये झोनच्या एकूण तरतूदी मध्ये कोणताही फेरबदल करण्यात आलेला नाही. करीता खालील प्रमाणे झोनल बजेट मधील तरतुदीमध्ये फेरबदल करण्यास स्थायी समितीची मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

<u>भांडवली</u>

| अ. क्र. | पद क्र. | पदाचे नाव | तरतुद | कमी करावयाची तरतुद | जास्त करावयाची तरतुद | सुधारीत तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 613 | भुमीगत नाली | 42.00 | (—) 14.50 | — | 27.50 |
| 2. | 676 | रस्त्याची सुधारणा व निर्माण (फुटपाथ अंतर्भुत) | 75.00 | — | (+) 15.00 | 90.00 |
| 3. | 637 | विहीरीवर जाळया तयार करुन बसविणे. | 2.50 | (—) 0.50 | — | 2.00 |
| | | **एकूण** | **119.50** | **(—) 15.00** | **(+) 15.00** | **119.50** |

## महसुली

| अ. क्र. | पद क्र. | पदाचे नाव | तरतुद | कमी करावयाची तरतुद | जास्त करावयाची तरतुद | सुधारीत तरतुद |
|---|---|---|---|---|---|---|
| 1. | 290 | सार्वजनिक संडासाची सुस्थीती व दुरुस्ती | 2.00 | (–) 1.50 | – | 0.50 |
| 2. | 334 | गलिच्छ वस्ती सुस्थीती व दुरुस्ती | 5.00 | – | (+) 1.50 | 6.50 |
| 3. | 331 | विहीरींची दुरुस्ती | 2.00 | (–) 0.50 | – | 1.50 |
| 4. | 293 | मेनहोल दुरुस्ती | 5.00 | – | (+) 2.00 | 7.00 |
| 5. | 330 | पुतळयांची सुस्थिती, दुरुस्ती व सौंदर्यीकरण | 2.50 | (–) 1.50 | – | 1.00 |
| | | **एकूण** | **16.50** | **(–) 3.50** | **(+) 3.50** | **16.50** |

**ठराव क्रमांक 360** :– प्रभाग क्र. 15(अ+ब) मध्ये प्रवेश नगर, वांजरीगांव, सदाफळे यांचे घराजवळ, विनोबा भावे नगर दर्पण ट्रेडर्स ते रिंग रोड, खोब्रागडे यांचे घरापर्यंत रस्त्याचे डांबरीकरणाचे कामास्तव रु. 29,99,680/– रकमेच्या प्राकलनास पद क्र. 682 (फिक्स प्रा.) अंतर्गत प्रशासकीय मंजुरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 361** :– प्रभाग क्र. 40 गांधीबाग उद्यानात विविध विकास कामाकरिता रु.45,49,809/– रकमेच्या कामास स्थायी समिती ठराव क्र. 187 दि. 23.11.2012 अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असून त्या अनुषंगाने निविदा मागविल्या असता प्राप्त निम्नतम निविदा खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | निम्नतम निविदाकार | टक्केकमी/ जास्त दर | निविदा राशी | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1. | विविध स्थापत्य कामे | मे. व्दारका कंस्ट्रक्शन | 20.55 टक्के प्रतीशत कमी दर | 16,54,770/– | निविदा 20.55 टक्के कमी दराची असल्यामुळे 5.55 टक्के अतिरिक्त सुरक्षा ठेव जमा करण्यात येईल. |
| 2. | इ.पी.डी.एम.रबर प्लोरींग | मे. इकोफ्लेक्ससरफेस | 2 टक्के कमी | 24,17,687/– | –– |
| | | | एकूण रु. | 40,72,457/– | |

करीता उपरोक्त निम्नतम निविदांना मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन त्यास एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 362** :– प्रभाग क्र. 12 ब, गुरुनानकपूरा, अशोकनगर येथे रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु. 39,99,995/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा तसेच या कामास्तव निविदा मागविण्यास मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 363** :– प्रभाग क्र. 04 अ व ब, येथे नविन वस्ती,मुकुंदनगर व आझादनगर मध्ये रबर मोल्डेड – I ब्लॉकचे पेव्हमेंट चे काम करण्याचे कामास्तव रु. 30,00,000/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 364** :– प्रभाग क्र. 20 अ व ब, येथे लष्करीबाग येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव रु. 29,99,993/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 365** :– प्रभाग क्र. 1 अ व ब, येथे विश्वासनगर, कुकरेजा नगर व कस्तुरबानगर वस्तीत रस्त्यांचे डांबरीकरण करण्याचे कामास्तव 30,00,000/– राशीचे प्राकलनास प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन लघुनिविदा काढण्यासह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 366** :– नागपूर महानगरपालिकेचे दरवर्षीचे अंदाजपत्रक मा.आयुक्त व्दारा तयार करुन स्थायी समितीस सादर करण्याचे अनुषंगाने तारीख निश्चित करण्याचा प्रश्न तसेच

नागपूर महानगरपालिकेला महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,2011 लागु करण्यात आलेला आहे. हया अधिनियमातील कलम 95 ''आयुक्ताने दरवर्षी उत्पन्न व खर्च यांचे अंदाज तयार करणे'' अंतर्गत आयुक्ताने दरवर्षी महानगरपालिका वेळोवेळी विहित करील अशा तारखेस किंवा स्थायी समिती वेळोवेळी मान्यता करील अशा नमुन्यात नागपूर महानगरपालिकेचे दरवर्षीचे अंदाजपत्रक मा. आयुक्त व्दारा स्थायी समितीस सादर करावयाचे आहे. याबाबत सदर अधिनियमात मा. आयुक्त व्दारा स्थायी समितीस कोणत्या तारखेस अंदाजपत्रक सादर करावयाचे याबाबत महानगरपालिका महासभेची मंजूरी प्राप्त करणे आवश्यक आहे. असे नमूद केले आहे. त्या अनुषंगाने नागपूर महानगरपालिकेचे दरवर्षीचे अंदाजपत्रक मा. आयुक्त व्दारा तयार करुन '' दिनांक 5 फेब्रुवारी ला किंवा त्या दरम्यान '' सादर करण्यासाठी तारीख निश्चित करण्याकरिता स्थायी समिती च्या मंजूरीस्तव सादर.

सदर प्रस्ताव स्थायी समितीचे मंजूरीनंतर महानगरपालिकेच्या महासभे समोर अंतिम मंजूरी करीता सादर करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन दिनांक 15

फेब्रुवारी ला मा. आयुक्त द्वारा नागपूर महानगरपालिकेचे दरवर्षीचे अंदाज पत्रक सादर करण्यासाठी, तारीख निश्चित करण्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक 367** :– मुंबई प्रांतिक अधिनियम 1949 (सुधारणा) व नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम 1948 (निरसन) 2011 (महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 2012) मधील कलम 20(3) अन्वये स्थायी समितीच्या 16 सदस्यांपैकी निम्मे 8 सदस्य दिनांक 01.03.2013 रोजी दुपारी निवृत्त होतील याचे नांवाचे निर्धारण चिट्या टाकून ठरविण्याचा प्रश्न समितीने विचारात घेऊन निगम सचिवांनी या संदर्भात करण्यांत येणारी कार्यवाही मा.अध्यक्ष यांच्या अनुमतीने सुरू केली. निगम सचिव यांनी या संदर्भात माहिती दिली कि चिठठया तयार करण्यांत आल्या असून 8 चिठठयावर कायम राहतील व 8 चिठठयावर निवृत्त असे नमुद असून त्या सर्वासमक्ष दाखविण्यांत आल्या. (यानंतर या सर्व चिठठया सर्वासमक्ष फोल्ड करण्यांत आल्या व पारदर्शक कंटेनर मध्ये मिसळण्यांत आल्या). मा.अध्यक्ष यांनी उपरोक्त चिठठया काढण्या संदर्भात मा.सदस्यांना कश्यापध्दतीने काढाव्या याबाबत विचारणा केली असता मा.सदस्यांनी मा.अध्यक्ष यांनी प्रथम चिठठी काढावी व मा.अध्यक्ष यांचे शेजारी बसलेल्या मा.सदस्यांच्या क्रमवारीनुसार चिठठया काढण्याचे सूचविले. त्यानंतर पारदर्शक कंटेनरमधील चिठठयांची पुन्हा एकदा सरमिसळ केल्यानंतर चिठठया काढण्यांस सुरूवात करण्यांत आली. आजच्या सभेला स्थायी समितीच्या मा.सदस्या श्रीमती हर्षला संजय जैसवाल या अनुपस्थित असल्यामुळे त्यांच्या नांवाची चिठठी मा. अध्यक्ष, स्थायी समिती यांनी दिलेल्या निर्देशानुसार मा.अपर आयुक्त यांनी काढली. त्या पुढीलप्रमाणे निघाल्या असून त्यांची नांवे खालीलप्रमाणे आहे.

**कायम सदस्य**

| | | |
|---|---|---|
| **1.** | श्री. तिवारी दयाशंकर चंन्द्रशेखर | **अध्यक्ष** |
| 2. | सौ. वानखेडे अनीता प्रदिप | सदस्या |
| 3. | श्री. सतीश विठ्ठलराव होले | सदस्य |
| 4. | श्री. फुके परिणय रमेश | सदस्य |
| 5. | सौ. सुजाता विठ्ठलराव कोंबाडे | सदस्या |
| 6. | श्री. थूल राजू वासुदेवराव | सदस्य |
| 7. | श्री. हजारे पुरूषोत्तम नागोराव | सदस्य |
| 8. | सौ. प्रगती अजय पाटील | सदस्या |

**निवृत्त सदस्य**

| | | |
|---|---|---|
| 1. | सौ. कानतोडे भाग्यश्री गणेश | सदस्या |
| 2. | सौ. बहादुरे सरोज राजु | सदस्या |
| 3. | श्री. खान असलमखां रशीद खान | सदस्य |
| 4. | श्री. डोळस रविंद्र गोविंदराव | सदस्य |
| 5. | श्री. राजू ज्योतीरामजी लोखंडे | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| 6. | श्री. गुडधे प्रफुल्ल विनोदराव | सदस्य |
| 7. | सौ.अलका अजय दलाल | सदस्या |
| 8. | सौ.जैसवाल हर्षला संजय | सदस्या |

उपरोक्त निवृत्त सदस्यांच्या जागा भरण्याकरिता स्थायी समितीने महानगरपालिकेस एकमताने शिफारस केली.

<u>ठराव क्रमांक 368</u> :– आजच्या सभेची कार्यवाही कायम करण्यास समितीने एकमताने मंजुरी प्रदान केली.

यानंतर मा. अध्यक्ष स्थायी समिती यांनी सभेची कार्यवाही अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

हस्ता/–हरीष दुबे
निगम सचिव
महानगरपालिका,नागपूर

हस्ता/– दयाशंकर तिवारी
अध्यक्ष
स्थायी समिती,
महानगरपालिका,नागपूर